श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

फेब्रुवारी २०२४ | वर्ष–१ अंक–१ | रु. ३.०० | मासिक, पाने ०८ । Regn. no. - MAHMAR/2022/86035

## ७५वा प्रजासत्ताक दिन एसव्हीजेसीटी, डेरवण येथे उत्साहात साजरा



विजयी विश्व तिरंगा प्यारा । झंडा उँचा रहे हमारा ।

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज् ट्रस्टच्या वैद्यकीय आणि शैक्षणिक संकुलामध्ये भारताचा ७५वा प्रजासत्ताक दिन मोठ्या दिमाखात साजरा झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित संस्कृत आणि भारतीय संस्कृतीच्या अभ्यासक डॉ. सुचेता परांजपे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, तर सन्माननीय अतिथी म्हणून सर्जनशील उद्योजक श्री. नरेंद्र काळे उपस्थित होते. या वेळी संस्थेचे विश्वस्त श्री अशोकराव जोशी आणि श्री. विकासराव वालावलकर, क्रीडा, शैक्षणिक आणि वैद्यकीय संस्थांचे संचालक, सर्व विभागांचे प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी तसेच पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ध्वजारोहण, राष्ट्रगीतगायन झाल्यावर शाळेतील पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक या विभागांतील विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, स्पॅनिश, जर्मन या विविध भाषांतून भारतीय प्रजासत्ताकाच्या गेल्या ७५वर्षातील देदीप्यमान कामगिरीचा आढावा घेणारी भाषणे केली. राष्ट्रभक्ती, देशाभिमान, कर्तव्य, त्याग यांसोबतच भारताची लोकनृत्ये आणि नीतीकथा, सण आणि पाककृती, कला आणि वास्तुकला, भाषिक विविधता, निसर्ग सौंदर्य, वैज्ञानिक शोध आणि प्रगती, भारतीय सैन्याची देशाप्रती समर्पित वृत्ती अशा विविध विषयांच्या अनुषंगाने भारताचा वैविध्यपूर्ण आणि समृद्ध वारसा विद्यार्थ्यांनी अभिमानाने कथन केला. लहान लहान विद्यार्थ्यांचे बोबडे बोल पण निर्भय सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या वेळी वैद्यकीय शिक्षण घेत असलेली प्रथम वर्षाची



ओवी कदम (नर्सरी) आणि मल्हार गावंडे (सिनिअर के.जी.) आत्मविश्वासाने बोलताना



डॉ. घाडगे, डॉ. सुवर्णा पाटील, श्री. विकासराव वालावलकर, श्री. नरेंद्र काळे, डॉ. सुचेता परांजपे, डॉ. मुल्हेरकर, डॉ. नाडकर्णी आणि श्री. अशोकराव जोशी

विद्यार्थिनी कु. मंजुषा बेटकर हिने हिंदीतून भाषण करत राष्ट्राच्या जडणघडणीमध्ये अपेक्षित असलेल्या युवकांच्या सहभागाची आणि एक जबाबदार नागरिक म्हणून असलेल्या कर्तव्यांची आठवण करून दिली.

त्यानंतर राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर शाळेचे प्रतिनिधित्व केलेल्या विविध गुणवंत खेळाडू विद्यार्थ्यांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

सन्माननीय पाहुणे श्री. नरेंद्र काळे यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या विविध विभागांना भेट दिल्याचे सांगून गेल्या ७ – ८ वर्षांत संस्थेची प्रगती दसपटीने झाली असून विविध क्षेत्रांत मिळवलेल्या प्रावीण्याचा आपणाला सार्थ अभिमान वाटत असल्याचे सांगितले. जगभरातील अनेक संस्था जाणून घेण्याचे भाग्य आपणाला लाभले आहे पण अध्यात्माचे अधिष्ठान व कर्मयोग यांचा पूर्ण समन्वय आणि उत्कृष्टता याचा संपूर्ण साक्षात्कार एका ठिकाणी होतो अशी डेरवण ही एकमेव जागा आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. शालेय विद्यार्थ्यांशी 'Entrepreneurship and Innovation' या विषयावर संवाद साधल्यावर पृथ्वीपासून ते आकाशाला गवसणी घालण्याचे विद्यार्थ्यांचे विचार ऐकून त्यांना येथे मिळणारे संस्कार, विज्ञान–तंत्रज्ञान क्षेत्रातील ज्ञान, शिक्षक व संस्थाचालक यांची तळमळ हे सर्व पाहून खूप समाधान वाटलं व भारताचे भवितव्य सुरक्षित असल्याचा विश्वास वाटला असे विचार श्री. नरेंद्र काळे यांनी व्यक्त केले.

प्रमुख पाहुण्या डॉ. सुचेता परांजपे यांनी आपल्या उद्‌बोधनपर भाषणाची सुरुवात प्रभू श्रीरामांनी मातृभूमीला उद्देशून काढलेले उद्‌गार, 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ।' यांनी केली. आपली माता आणि मातृभूमी या स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ आहेत असे सांगून आपण आपल्या राष्ट्राला 'भारतमाता' असे म्हणतो आणि आपली जन्मभूमी कशी श्रेष्ठ आहे ते अगदी लहान नर्सरी वर्गातल्या मुलीपासून ते मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थिनींपर्यंत सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले ते ऐकून आनंद झाल्याचे त्या म्हणाल्या. तसेच प्राचीन काळी गुरुकुलातून शिक्षण घेऊन बाहेर पडताना गुरूंकडून शिष्याला 'स्नातक उपदेश' दिला जात असे, त्याचा पहिला उपदेश आहे, 'सत्यं वद ।' म्हणजे नेहमी खरे बोला; दुसरा उपदेश आहे, 'धर्मं चर ।' याचा अर्थ धर्म म्हणजेच कर्तव्याच्या मार्गावर चाला; आणि तिसरा उपदेश आहे, 'स्वाध्यायान्मा प्रमदः।' म्हणजे अभ्यास करण्यात आळस करू नका. यात डॉ. सुचेता परांजपे यांनी 'श्रद्धस्व सौम्य:।' हा एक उपदेश जोडत, सर्वांनी श्रद्धेने काम केल्याने ज्ञान प्राप्त होते, श्रद्धा असणे हा एक गुणधर्म आहे असे सांगितले. तसेच स्नातक संस्कारांमध्ये 'मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवो भव । अतिथिदेवो भव ।' या बरोबरच




कु. मंजुषा बेटकर युवा पिढीला कर्तव्यांची जाणीव करून देताना



जलतरणातील राज्यस्तरीय प्रावीण्याबद्दल कु. तनिष्क कदम याचा सत्कार



*रायफल शूटिंगमधील विभागस्तरीय प्रावीण्याबद्दल कु. हर्ष बागवे याचा सत्कार*



*श्री. नरेंद्र काळे आपले विचार व्यक्त करताना*

‘राष्ट्रदेवो भव ।’ या विचाराची जोड त्यांनी दिली. ‘राष्ट्रदेवो भव’ म्हणजे राष्ट्राची पूजा करा असा अर्थ नसून, आपल्या राष्ट्रावर श्रद्धा ठेवून राष्ट्राप्रती कर्तव्यनिष्ठ राहा, असे प्रतिपादन त्यांनी केले. एका लहान मुलाने आपल्या भाषणात म्हटले, ‘Let us be responsible citizens of our country.’ याचे कौतुक करत डॉ. सुचेता परांजपे यांनी आपल्या जबाबदारीची आठवण करून देत सर्वांना अमृत महोत्सवी प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यानंतर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये राष्ट्रभक्तिपर गीतांवर आधारित विविध नृत्यांचे आकर्षक कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केले. पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक विभागाच्या बालकलाकारांनी सादर केलेल्या बटरफ्लाय डान्स, राष्ट्रीय एकात्मता, मास ड्रिल आणि फ्लॉवर ड्रीलने उपस्थितांची वाहवा मिळवली. माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी भारताची एकता आणि अखंडता व अंतराळ विज्ञानातील प्रगती या संकल्पनेवर आधारलेल्या नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. शाळेच्या योग संघाने कौशल्यपूर्ण योगासनांची तर मल्लखांब संघाने चित्तथरारक मल्लखांब प्रात्यक्षिके सादर केली. विद्यार्थ्यांमध्ये लवचिकता, एकाग्रता, आत्मविश्वास, शिस्त, संघभावना, नियमांचे पालन, इ. गुण दिसून आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांनी केले. पाहुण्यांची ओळख अनन्या जोगळेकर व गितांजली सकपाळ यांनी करून दिली. प्राची गोखले यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. यानंतर सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.



*डॉ. सुचेता परांजपे : श्रद्धा असणे हा एक गुणधर्म आहे*



*ज्युनिअर के.जी.तील मुले ‘बटरफ्लाय डान्स’ करत बागडताना*



*प्राथमिक शाळेतील मुले ‘फ्लॉवर ड्रिल’ सादर करताना*

# सी.सी.एम.पी. कोर्सच्या डॉक्टर्सनी व्यक्त केली संस्थेबद्दल कृतज्ञता



*डॉ. सुवर्णा पाटील आणि डॉ. अक्कलकोटकर यांच्यासह सी. सी. एम. पी. कोर्समधील सहभागी B.H.M.S.डॉक्टर्स*

सी. सी. एम. पी. कोर्सच्या २०२२च्या (बॅच)BHMS डॉक्टर्सनी वालावलकर हॉस्पिटलला (लिटल एनी क्यूसीपीआर) या कंपनीचे २ डमी भेट/ देऊन विद्यालयाबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त केली .

वालावलकर रुग्णालयातील सुसज्ज अशा स्किल लॅबमध्ये नेहमीच बेसिक लाइफ सपोर्ट (बीएलएस)सारख्या अनेक प्रात्यक्षिकांच्या कार्यशाळा पार पाडल्या जातात. अशा प्रशिक्षणासाठी लिटल एनी क्यूसीपीआर एक किफायतशीर आणि वास्तववादी सीपीआर मॅनिकिन आहे. ह्या मॅनिकिनची छाती अगदी जिवंत रुग्णासारखा भाव निर्माण करते आणि प्रतिसादही देते आणि ट्रेनिंग सुलभ आणि सोपे होते. हे क्यूसीपीआर ॲप्स आणि स्किलगाइड वापरून मोबाइल डिव्हाइसवर, सीपीआर कार्यप्रदर्शनाच्या रिअल-टाइम ऑप्टिमायझेशनसाठी ऑडिओ-व्हिज्युअल सीपीआर फीडबॅक प्रदान करण्यासाठी मदत करणार आहे.

क्यूसीपीआर सेन्सर मापन आणि अभिप्राय तंत्रज्ञान, सूचनांमधून अंदाज घेते. ब्लूटूथ लो एनर्जी (BLE) स्मार्टफोन आणि टॅब्लेटशी कनेक्टिव्हिटी असल्याकारणाने वापरणे सुलभ होणार आहे. ह्याचा उपयोग नक्कीच रुग्णाचे प्राण वाचवण्याकरता तसेच कार्यशाळेसाठी होणार आहे.

# पोलीस उप-अधीक्षक श्री. राजेंद्रकुमार राजमाने यांची वालावलकर हॉस्पिटला भेट

श्री. राजेंद्रकुमार राजमाने (डी.वाय.एस्.पी.) यांनी वालावलकर हॉस्पिटलला दि. ३१ जानेवारी २०२४ रोजी सदिच्छा भेट दिली.

श्री. राजेंद्रकुमार हिंदुराव राजमाने हे बी.एस्सी. (फिजिक्स) ही पदवी घेऊन सन १९९३मध्ये एम.पी.एस्.सी. सेवा भरतीने पोलीस उपनिरीक्षक या पदावर सेवेत रुजू झाले. त्यानंतर मुंबई, सांगली, सातारा, पुणे, अमरावती अशा विविध ठिकाणी सेवा बजावून सध्या पोलीस उप-अधीक्षक या पदावर चिपळूण येथे कार्यरत आहे. श्री. राजमाने यांनी संस्थेचे विश्वस्त श्री. अशोकराव जोशी यांची भेट घेतली तसेच वालावलकर हॉस्पिटलमधील विविध योजनांची माहिती घेतली



*डावीकडून : डॉ. नेताजी पाटील, श्री. श्रीपती वालावलकर, डॉ. सुवर्णा पाटील, श्री. अशोकराव जोशी (विश्वस्त )आणि श्री. राजेंद्रकुमार राजमाने(पोलिस उप-अधीक्षक)*

# वालावलकर रुग्णालयात 'सॉफ्ट इम्बालबिंग कॅडेव्हर' तंत्रज्ञान विकसित



डॉ. प्रशांत मुल्या (प्रोफेसर ॲनाटॉमी) यांचा सत्कार करताना डॉ. लान्स कोप (रेडिओलॉजिस्ट, U.K. )




डॉ. प्रशांत मुल्या (प्रोफेसर ॲनाटॉमी) यांचा सत्कार करताना डॉ. संजय देशपांडे (भूलतज्ज्ञ, U.K.)

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल व रिसर्च सेन्टरमधील ॲनाटॉमी विभागातील प्राध्यापक डॉ. प्रशांत मुल्या यांनी 'कॅडेव्हर सॉफ्ट इम्बालबिंग टेक्निक' विकसित केलेले आहे. गेली २ ते ३ वर्षे डॉ. प्रशांत मुल्या अशा प्रकारचे तंत्र विकसित करण्याचा प्रयत्न करत होते. त्यांच्या या प्रयत्नास आता यश आलेले आहे. फॉर्मेलिनचा वापर करून केलेल्या 'इम्बालबिंग प्रक्रिये'मुळे मृतदेह जतन होत असला तरी त्यात कडकपणा येतो. माणूस जिवंत असताना त्याची त्वचा जशी असते, सांध्यांची हालचाल जशी होते, तसे अर्थातच ते नंतर राहू शकत नाही. त्यामुळे शस्त्रक्रियेचा सराव करताना प्रशिक्षणार्थी डॉक्टर्सना तो अनुभव मिळू शकत नाही. 'सॉफ्ट इम्बालबिंग' हे तंत्रज्ञान वापरून मृतदेह मानवी शरीराप्रमाणे मऊ राखला जातो. तसेच तो सात-आठ महिने टिकू शकतो. त्यामुळे शल्य चिकित्सकांना अधिक चांगला सराव करता येतो. जागतिक कीर्तीचे डॉ. सतीशचंद्र गोरे (एन्डोस्कोपिक स्पाइन सर्जन, पुणे) यांच्या एन्डोस्कोपी स्पाइन सर्जरीची कार्यशाळा नुकतीच दि. ११ जानेवारी ते २१ जानेवारी या काळात वालावलकर रुरल मेडिकल कॉलेजमध्ये पार पाडली. या कार्यशाळेस ३० सर्जन्स सहभागी झाले होते. त्यापैकी डॉ. लुईस नेल हे न्यूरोसर्जन साउथ आफ्रिकेतून आले होते. इतर सर्व जण भारताच्या विविध भागातून सहभागी झालेले होते. या कार्यशाळेत प्रात्यक्षिकांसाठी डॉ. मुल्या यांनी विकसित केलेल्या तंत्राचा वापर करून कॅडेव्हर (डेड बॉडी) तयार करण्यात आले होते. त्यामुळे सर्व सहभागी डॉक्टर्सना अतिशय उच्च दर्जाची अशी प्रात्यक्षिके करता आली.

तसेच इंग्लड येथील डॉक्टरांच्या वैद्यकीय परिषदेतदेखील रिजनल ॲनेस्थेशिया ब्लॉक्सच्या कार्यशाळेसाठीसुद्धा डॉ. प्रशांत मुल्या यांनी विकसित केलेल्या टेक्निकद्वारे तयार केलेली कॅडेव्हर (डेड बॉडी) वापरण्यात आली .डॉ. सतीशचंद्र गोरे, डॉ. लुईस नेल, 'यु.के.' येथील डॉ. संजय देशपांडे, डॉ. लान्स कोप, डॉ. सारंग पुराणिक इत्यादी सर्व आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या डॉक्टरांनी डॉ. प्रशांत मुल्या यांच्या कार्याचे कौतुक केले. डॉ. प्रशांत मुल्यांसारख्या हरहुन्नरी, उत्साही व्यक्तिमत्त्वामुळेच अशा प्रकारच्या कार्यशाळांना उच्च दर्जा देणे शक्य झाले आहे असे उद्गार डॉ. लान्स कोप यांनी काढले डॉ. प्रशांत मुल्या यांचा संस्थेच्या वतीने डॉ. लान्स कोप यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र व रोख मानधन देऊन सत्कार करण्यात आला. सत्कार प्रसंगी डॉ. सुवर्णा पाटील (मेडिकल डायरेक्टर), डॉ. मानसिंग घाडगे (डीन), डॉ. संजय देशपांडे (भूलतज्ज्ञ, इंग्लंड) व रुरल मेडिकल कॉलेजचा सर्व स्टाफ व सर्व ब्रिटिश डॉक्टर्स व सिस्टर्स उपस्थित होत्या.

## स.न.वि.वि.



*माननीय सुवर्णा पाटील मॅडम*
*बी. के. एल. वालावलकर हॉस्पिटल, डेरवण*

*मी श्रीपाद रामचंद्र जोशी. आज दि. २८ जानेवारी रोजी आपल्या हॉस्पिटलमध्ये रक्त, लघवी तसेच इतर चेकअपसाठी येऊन गेलो. त्याआधी २०१९ या वर्षात माझ्या पायाच्या ऑपरेशनमुळे मी हॉस्पिटलला ॲडमिट होतो.*

*माझे सर्व टेस्टचे रिपोर्ट मला संध्याकाळी प्राप्त झाले तसेच प्रत्येक ठिकाणी मला उत्तम मार्गदर्शन आणि वैद्यकीय सल्ला मिळाला. एक गोष्ट नमूद करावीशी वाटते. २०१९ला असलेला आपल्या हॉस्पिटलचा चेहरा-मोहरा या वेळेस आतून खूपच बदलून गेलेला वाटला. प्रशस्त रिसेप्शन, अत्यंत तत्परतेने कमी वेळात काढलेला केस-पेपर, नम्रतेने तसेच न चिडता प्रत्येक जण माहिती देऊन सहकार्य करत होता. नेत्र तपासणी, बॉडी कंपोझिशन, ॲनालायझर रिपोर्ट, मधुमेह-रक्तदाब संबंधीचे मला केलेले मार्गदर्शन; सारेच लक्षात राहण्यासारखे होते. संध्याकाळी सर्व रिपोर्ट घेऊन परतताना आपल्याला भेटणार होतो परंतु आपली भेट होऊ शकली नाही. त्यामुळेच या धन्यवादपर दोन ओळी लिहीत आहे. आपले तसेच आपल्या सर्व सहकाऱ्यांचे शतशः आभार.*

**- श्रीपाद रामचंद्र जोशी**

# वालावलकर रुग्णालयात रिजनल अनेस्थेशिया कार्यशाळेचे आयोजन



*रिजनल ॲनेस्थेशिया कार्यशाळेत बोलताना डॉ. सारंग पुराणिक (यु.के.)*




*रिजनल ॲनेस्थेशिया कार्यशाळेसाठी सहभागी डॉक्टरांसमवेत डॉ. देशपांडे आणि डॉ. सारंग पुराणिक*

वालावलकर रुग्णालयात ब्रिटिश डॉक्टर्स व सिस्टर्स यांचा चमू दि.२७ जानेवारीला दाखल झाला. दि. २९ रोजी वालावलकर रुग्णालयात रिजनल ॲनेस्थेशिया कार्यशाळा भुलतज्ज्ञांसाठी आयोजित केली होती. या कार्यशाळेत डॉ. संजय देशपांडे (यु.के.), डॉ. सारंग पुराणिक (यु. के.), डॉ. संघमित्रा कुलकर्णी, डॉ. किरण धोनर (पुणे), डॉ. अंकित सहानी (पुणे) या भूलतज्ज्ञांनी २० भूलतज्ज्ञांना प्रशिक्षण दिले.

हात किंवा पायावर शस्त्रक्रिया करायची असेल तर त्या भागापुरतीच मर्यादित भूल देणे हा कार्यशाळेचा विषय होता. रुग्णाला त्यामुळे संपूर्ण भूल द्यावी लागत नाही. तसेच त्यांनी उपस्थित डॉक्टर्सना प्रात्यक्षिकेही करून दाखविली. ही प्रात्यक्षिके सॉफ्ट इम्बालबिंग कॅडेव्हरवरती करण्यात आली. सॉफ्ट इम्बालबिंग कॅडेव्हर(डेड बॉडी) तयार करण्याची पद्धती वालावलकर मेडिकल कॉलेजचे ॲनाटॉमी विभागाचे प्राध्यापक डॉ.प्रशांत मुल्या या यांनी विकसित केली आहे. ह्या अतिशय उच्च दर्जाच्या नवीन पद्धतींमुळे कार्यशाळेत प्रात्यक्षिके दाखवणे अतिशय उच्च दर्जाचे झाले. कार्यशाळेतील सर्व डॉक्टर्सना त्यामुळे रुग्णांवरच प्रोसिजर करत असल्याचा अनुभव घेता आला.

अशा प्रकारची उच्च दर्जाची प्रात्यक्षिके भारतात फारच कमी प्रमाणात होतात. डॉ. प्रशांत मुल्या यांच्या ह्या नवीन विकसित पद्धतीमुळे आता वालावलकर रुग्णालयात रिजनल ॲनेस्थेशिया सारख्या उच्च दर्जाच्या कार्यशाळा यशस्वी होऊ लागल्या आहेत. वालावलकर रुग्णलयाचे भूलतज्ज्ञ डॉ. लीना ठाकूर, डॉ. संदीप राव, डॉ. हृषीकेश येलगुडकर, डॉ. भाऊसाहेब पवार यांनी कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी अतिशय मेहनत घेतली.

# मुंबई येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत डेरवण प्रकल्पाचे कौतुक

दि. ५ आणि ६ जानेवारी २०२४ रोजी 'लाइफ सायन्स इन्स्टिट्युट' तर्फे कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालय, मुंबई येथे मधुमेहासंबंधी 'प्रि-डायबेटिस ते डायबेटिस' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत भारतातील नामवंत शास्त्रज्ञांची उपस्थिती होती. त्यात चेन्नई येथील मधुमेहतज्ज्ञ पद्मश्री डॉ. व्ही. मोहन, एंडोक्राइनोलॉजिस्ट पद्मश्री शशांक जोशी, 'नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ न्युट्रिशन, हैदराबाद'चे माजी संचालक डॉ. शशिकरन, पुण्यातील मधुमेहतज्ज्ञ डॉ. याज्ञिक तसेच आहारतज्ज्ञ आदींचा समावेश होता. संस्थेतर्फे डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. नीलम शिरसाट, डॉ. ज्योती अय्यर, श्री. चारुदत्त जोगळेकर, सौ. पल्लवी भट आणि ओम्कार डेरवणकर यांनी सहभाग घेतला. डॉ. सुवर्णा पाटील यांनी आपल्या संस्थेमध्ये सुरू असणाऱ्या डेरवण कोहोर्ट या किशोरवयींन मुलींकरता सुरू असलेल्या प्रकल्पाविषयी प्रबंध सादर केला. या प्रकल्पात त्यांनी सादर केलेल्या 'कुपोषित मुलींमधील प्रि-डायबेटिस' या संशोधनाने परिषदेतील नामवंत शास्त्रज्ञांचे लक्ष वेधले गेले. उपस्थितांमधील शास्त्रज्ञांनी या संशोधनाचे कौतुक केले व आपल्या सहकार्याने डेरवण येथे नवीन संशोधन प्रकल्प राबविण्यास उत्सुकता दर्शवली.



*डावीकडून : डॉ. ज्योती अय्यर, डॉ. व्ही. मोहन, डॉ. पाटील, डॉ. शिरसाट*

# डॉक्टर आशिष लेले यांची वालावलकर हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेजला भेट



*डावीकडून : श्री. बाळासाहेब काजरेकर, श्री. विकासराव वालावलकर, श्री. अशोकराव जोशी, डॉ. आशिष लेले, सौ. लेले, डॉ. पाटील, डॉ. मुल्हेरकर*

डॉक्टर आशिष किशोर लेले यांनी वालावलकर हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेजला दि. ३१ जानेवारी २४ रोजी सदिच्छा भेट दिली.डॉक्टर आशिष लेले हे रासायनिक अभियंता, रिओलॉजिस्ट आणि राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे या संस्थेचे संचालक आहेत. पॉलिमरच्या सूक्ष्म आणि मेसोस्ट्रक्चरवरील संशोधनासाठी ते ओळखले जातात आणि ते इंडियन ॲकॅडमी ऑफ सायन्सेस आणि इंडियन नॅशनल ॲकॅडमी ऑफ इंजिनीअरिंगचे फेलो आहेत.

वैज्ञानिक संशोधनासाठी भारत सरकारची सर्वोच्च संस्था असलेल्या वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेने त्यांना २००६मध्ये अभियांत्रिकी विज्ञानातील योगदानाबद्दल सर्वोच्च भारतीय विज्ञान पुरस्कारांपैकी एक असा, विज्ञान आणि तंत्रज्ञानासाठीचा 'डॉ. शांतीस्वरूप भटनागर पुरस्कार' प्रदान केला. त्यांना सन २०१२मध्ये 'इन्फोसिस पारितोषिक'ही मिळाले आहे.

अद्ययावत उपचारपद्धती आणि आध्यात्मिक वातावरण यांची उत्तम सांगड घातलेल्या ह्या संस्थेत सर्व सेवाभावी डॉक्टर्स शास्त्रज्ञ, इंजिनीअर्स यांच्या योगदानामुळे नियोजित उद्दिष्ट गाठणे सोपे जाणार आहे अणि NCL तर्फे आम्ही काही योगदान हे संशोधन पुढे नेण्याकरित देऊ शकतो असा विश्वास डॉ लेलेनी दाखवून संस्थेचे कौतुक केले.

# तुरंबव येथील महिलांसाठी बचत गट मेळावा

दि.०९ जानेवारी रोजी भ.क.ल. वालावलकर वैद्यकीय ग्रामीण महाविद्यालय येथे तुरंबव गावातील बचत गटाच्या महिलांनी स्वतः पुढाकार घेऊन, स्वतःचे आरोग्य सुदृढ कसे राखता येईल याची माहिती मिळावी म्हणून एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या मेळाव्यासाठी शंभराहून अधिक महिला स्वखुशीने उपस्थित होत्या आणि सर्व कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होऊन त्यांनी आरोग्याबद्दलच्या सर्व शंकांचे निराकरण करून घेतले. संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन करताना स्त्रियांनी अशा प्रकारे स्वतःच्या आरोग्याबद्दल जागरूकता दाखवल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

डॉ. रचना पावसकर (पी.एस.एम. डिपार्टमेंट) यांनी कर्करोगाची पूर्वलक्षणे कशी ओळखावीत आणि स्तनाचा, गर्भाशय मुखाचा, तोंडाचा कर्करोग इत्यादीविषयी मार्गदर्शन केले. डॉ. आसावरी मोडक यांनी रुग्णालयातील सुविधा आणि उपचारांकरिता असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. रूपाली चव्हाण यांनी मानसिक आरोग्य व गरोदर माताचे आरोग्य याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. ज्योती अय्यर यांनी संस्थेच्या कौशल्य विकास केंद्रात महिलांसाठी असलेल्या विविध व्यवसायाभिमुख शिक्षण आणि अन्य कोर्सेस याबद्दल मार्गदर्शन केले.



*बचत गट मेळाव्या साठी उपस्थित महिला*



*ट्रस्टच्या कौशल्य विकास केंद्रातून व्यवसायाभिमुख उपक्रमांची माहिती घेताना*

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

ORIGINAL

भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA

**भारत के समाचारपत्रों के पंजीयक का कार्यालय**
**OFFICE OF THE REGISTRAR OF NEWSPAPERS FOR INDIA**

**पंजीयन प्रमाणपत्र**
**CERTIFICATE OF REGISTRATION**

प्रमाणित किया जाता है कि प्रेस और पुस्तक पंजीकरण अधिनियम, 1867 के अन्तर्गत इस समाचारपत्र को पंजीकृत कर लिया है :
This is to certify that this newspaper has been registered under the Press and Registration of Books Act, 1867 :

| | |
|---|---|
| 1. समाचार पत्र का नाम<br>Title of the Newspaper | SHREEKSHETRA DERVAN WARTAPATRA |
| 2. समाचार पत्र की पंजीयन संख्या<br>Registration Number of the Newspaper | MAHMAR/2022/86035 |
| 3. भाषा/भाषाएं, जिसमें/जिनमें समाचारपत्र प्रकाशित किया जाता है<br>Language/Languages in which it is published | मराठी /MARATHI |
| 4. इसके प्रकाशन का नियतकाल तथा जिस दिन/दिनों तिथियों कोयह प्रकाशित होता है<br>Periodicity of its publication and the day/days/ dates on which it is published | मासिक MONTHLY |
| 5. समाचारपत्र की फुटकर कीमत<br>Retail selling price of the newspaper | RS.3/- |
| 6. प्रकाशक का नाम Publisher's Name | VIKAS KAMLAKAR WALAWALKAR |
| राष्ट्रीयता/Nationality | INDIAN |
| पता/Address | B.K.L. WALAWALKAR HOSPITAL, AT-DERVAN, POST-SAWARDE, TAL-CHIPLUN, DIST- RATNAGIRI, MAHARASHTRA-415606 |
| 7. मुद्रक का नाम Printer's Name | VIKAS KAMLAKAR WALAWALKAR |
| राष्ट्रीयता/Nationality | INDIAN |
| पता/Address | B.K.L. WALAWALKAR HOSPITAL, AT-DERVAN, POST-SAWARDE, TAL-CHIPLUN, DIST- RATNAGIRI, MAHARASHTRA-415606 |
| 8. सम्पादक का नाम Editor's Name | VIKAS KAMLAKAR WALAWALKAR |
| राष्ट्रीयता/Nationality | INDIAN |
| पता/Address | B.K.L. WALAWALKAR HOSPITAL, AT-DERVAN, POST-SAWARDE, TAL-CHIPLUN, DIST- RATNAGIRI, MAHARASHTRA-415606 |
| 9. जिस स्थान पर मुद्रण का काम होता है, उसका सही तथा ठीक विवरण<br>True and precise account at the premises where printing is conducted | DHANASHRI OFFSET 3/208, PATRAKAR COLONY, KUWARBAV, BEHIND RAILWAY STATION BUS STOP, RATNAGIRI, TALUKA & DIST- RATNAGIRI, MAHARASHTRA- 415639 |
| 10. प्रकाशन का स्थान<br>Place of publication | B.K.L. WALAWALKAR HOSPITAL, DIAGNOSTIC &RESEARCH CENTER, AT-DERVAN, POST-SAWARDE, TAL-CHIPLUN, DIST-RATNAGIRI, MAHARASHTRA-415606 |

दिनांक /Date:11/01/2024

https://rni.nic.in/registerdtitle_search/Regist_printOnlineCR.aspx?Reg=fFQjsT4Rionl739tW3%2buQ%3d%3d 1/2

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवरबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले.Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035